**Goan Varta, Sunday 25 August 2019**

# कृषी विद्यालयाचे विद्यार्थी देताहेत शेतकऱ्यांना धडे !

प्रतिनिधी। गोवन वार्ता

## माहितीच्या देवाण-घेवाणीसाठी फातोर्ड्यात मुक्काम

**पणजी** : राज्यात युवा पिढीला शेतीकडे वळविण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरूच असतानाच युवकांकडूनही कृषी क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. सुळकर्णे-केपे येथील डॉन बॉस्को कृषी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून कृषी क्षेत्राचा जवळून अनुभव घेण्यासाठी अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. फातोर्डा या ग्रामीण भागात जाऊन गेले तीन महिने हे विद्यार्थी शेतकऱ्यांसोबत राहत असून. शेतीविषयी माहितीची देवाण-घेवाण करीत आहेत.




विद्यार्थ्यांतर्फे आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिला

या उपक्रमाविषयी माहिती देताना विद्यार्थी सनिल गावकर याने सांगितले, की शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राविषयी माहिती व्हावी, यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. आजच्या आधुनिक काळात तंत्रज्ञान, सरकारच्या योजना तसेच अन्य महत्त्वाच्या संकल्पना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सहा महिने

> आमचा सहा विद्यार्थ्यांचा गट आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच पर्यावरणाप्रती संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी देखील आम्ही कार्यक्रम आयोजित करत आहोत.
>
> — **सनिल गावकर**, विद्यार्थी

आम्ही या गावात राहणार असून, जून महिन्यात या उपक्रमाला आम्ही सुरुवात केली होती, असे सनिल याने सांगितले.

या विद्यार्थी गटातील सहा विद्यार्थ्यांमध्ये सनिल गावकर, अक्षय सावंत, पवन सावंत, महेंद्र

> आम्ही शेतकऱ्यांना नवनवीन तंत्राविषयी माहिती देतच आहोत. मात्र, शेतकऱ्यांकडून आम्हाला त्यांचा कित्येक वर्षांचा बहुमोलाचा अनुभव मिळत आहे. शेतकऱ्यांची शेतात वावरण्याची व कामाची शैली भविष्यात शेतकामासाठी आम्हाला फार उपयुक्त ठरणार आहे.
>
> — **ब्रिजेश फळदेसाई**, विद्यार्थी

कदम, स्वप्निल गुरव व ब्रिजेश फळदेसाई यांचा समावेश आहे. विद्यार्थी शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती देऊन शेतकामात मदतही करीत आहेत.